(रु. १००/- च्या मुद्रांकावर)

# प्रपत्र - ड

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

### प्रतिज्ञापत्र तथा हमीपत्र

### (हस्तांतरण करुन देणार व घेणार यांनी एकत्रित द्यावयाची)

मी/आम्ही खाली सही करणारे **श्री/श्रीमती** .................... **वय वर्षे** ....................... **श्री./श्रीमती** ................................ **वय वर्षे** .......... रा. पो.......................... ता............................... जि. .............. हस्तांतरण करुन देणार व श्री/श्रीमती................................................... वय/ वर्षे............... रा............. पो.................. ता.................... जि. .................. हस्तांतर करुन घेणार सत्य प्रतिज्ञेवर गांभिर्यपूर्वक लिहून देत आहोत की साडेबारा / गावठण विस्तार योजनेनुसार मौजे ...................... येथील सेक्टर...................... मध्ये भूखंड क्र.................. क्षेत्र................. चौ. मि. सिडकोने श्री/श्रीमती .............................. .......................... यांना वाटप केला असून सदरचा भूखंड श्री/श्रीमती ................... .......................................... यांच्या नावे हस्तांतरीत करण्यांत यावा असा अर्ज आम्ही दिनांक ................ रोजी केला असून या अर्जासोबत सदरचा भूखंड हस्तांतरीत करुन घेणार व हस्तांतरीत करुन देणार यांनी आवश्यक ते अनुमती तथा हमीपत्र व घोषणापत्र तथा हमीपत्र सादर केले आहे. या भूखंडाचे हस्तांतरण आम्ही कायमस्वरुपी करु इच्छितो.

सदर भूखंडाचे हस्तांतरण करण्यास परवारनगी देण्यांकरीता ठरविण्यांत आलेले हस्तांतरण शुल्क भरावयास आम्ही कबूल आहोत.

उपरोक्त भूखंडाच्या बाबतीत आजतागायत कोणत्याही न्यायालयामध्ये दावा दाखल झालेला नाही. तसेच कोणत्याही न्यायालयाने या भूखंडाच्या हस्तांतरणास मनाई हुकूम दिलेला नाही. अथवा जशी आहे तशी परिस्थिती ठेवण्याचा कोणताही आदेश दिलेला नाही. त्याचप्रमाणे संपादित झालेली जी जमीन विचारांत घेऊन उपरोक्त भूखंडाचे वाटप करण्यांत आले आहे. त्या जमिनीमध्ये व त्या अनुषंगाने देण्यांत येणाऱ्या सर्व फायदयांमध्ये कोणीही हक्क, हित, संबंध व दावा सांगितलेला नाही. त्याचप्रमाणे सदर भूखंड जी संपादित झालेली जमीन विचारांत घेऊन वाटप करण्यात आला आहे, त्या जमिनीबद्दल शासनाकडे, न्यायालयामध्ये, कोणत्याही प्राधिकारणाकडे अथवा प्राधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारची तक्रार करण्यांत आलेली नाही किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने हित, संबंध, दावा सांगितलेला नाही अथवा याबाबत कोणतीही चौकशी सुरु नाही किंवा कोणताही आदेश देण्यांत आलेला नाही. तसेच या भूखंडाचे वाटप जमिनीच्या संपादनाचे व इतर जे कागदपत्र, संबधीत भूधारकाने सिडकोकडे सादर केले आहेत. त्या कागदपत्राच्या व दिलेल्या माहितीच्या आधारावर करण्यात आले आहे, त्यामुळे सदर कागदपत्र व भूखंड वाटपासाठी दिलेली माहिती केव्हाही चुकीची आहे, खोटी आहे अथवा प्रत्यक्ष वस्तुस्थिती व दिलेली माहिती यामध्ये तफावत आहे असे केव्हाही निर्दशनास आल्यास सदर भूखंडाचे देयकपत्र आणि करारनामा अथवा भाडेपट्टाखत, ही बाब निदर्शनास आल्याच्या दिवसापासून मुळातूनच आपोआप रद्द होईल व या भूखंडाचे उत्तरदायीत्व असलेल्या हस्तांतर करुन घेणाऱ्याने या बाबतीत सर्व जबाबदारी घेतली आहे

असे समजले जाईल याची आम्हांस जाणीव देण्यात आली आहे व ती आम्हांस मान्य आहे. तसेच अशा प्रसंगी सदर भूखंडावर बांधण्यात आलेल्या कोणत्याही वास्तुसह नुकसान भरपाई अथवा इतर कोणत्याही प्रकारची रक्कम न देता सदर भूखंडाचा ताबा सिडको घेईल व तसे करण्यास या भूखंडाशी ज्याचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध येतो अशी कोणतीही व्यक्ती विरोध व विवाद करणार नाही हे आम्हांस कबूल आहे. तसा तो कोणी केल्यास त्याचे निराकरण स्वखर्चाने करुन देण्याची जबाबदारी आम्ही याद्वारे घेत आहेत.

नवी मुंबई क्षेत्रामध्ये उपरोक्त भूखंडाखेरीज अन्य कोणताही भूखंड या वाटपदारास वाटप करण्यात आलेली नाही. एकूण वाटप करण्यात आलेले क्षेत्र ५०० चौ.मी.हून कमी आहे त्यामुळ नागरी जमिन (कमाल मर्यादा व नियमन) अधिनियमान्वये धारण केलेली जमिन अतिरिक्त ठरत नाही.

नवी मुंबई क्षेत्रामध्ये हस्तांतरीत करावयाच्या भूखंडाखेरीज, खाली नमूद केलेले भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत.

| **गावाचे नाव** | **भूखंड क्रमांक** | **क्षेत्र** |
|---|---|---|
| | | |

उपरोक्त वाटप करण्यांत आलेले एकूण क्षेत्र ५०० चौ.मी. क्षेत्राहून जास्त असल्याने त्यास नागरी जमीन (कमाल मर्यादा व नियमन) अधिनियमाच्या तरतुदी लागू होत असल्यामुळे हे क्षेत्र धारण करण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांकडून आवश्यक ती सूट मिळवून तसा आदेश सिडकोकडे सादर केला आहे/तसा आदेश आम्ही सिडकोकडे त्वरित सादर करु.

हे प्रतिज्ञापत्र आम्ही आज दिनांक .............. माहे ............. सन .............. रोजी.......... येथे भूखंडाचे हस्तातरण करुन देणार व भूखंडाचे हस्तातरण करुन घेणार यांनी स्वखुशीने स्वतःच्या संमतीने व सिडकोस कोणत्याही प्रकारची तोशिष लागू नये म्हणून करुन दिले.

लिहून देणार

**दिनांक :**

**स्थळ :**

**समक्ष :**

---

**महत्वाची टिप -** **१ हे प्रतिज्ञापत्र, केवळ तालुका, दंडाधिकारी/उपविभागीय दंडाधिकारी/जिल्हा दंडाधिकारी/ दिवाणी न्यायाधिश व न्याय दंडाधिकारी यांच्या समक्षच केलेले असले पाहिजे.**

**२. या प्रतिज्ञापत्रावर समक्ष म्हणून सही करणाऱ्या अधिकाऱ्याने व्यक्तिच्या ओळखीची पूर्ण खात्री असल्याशिवाय समक्षतेची सही करु नये.**